# मेंढपाळ राजाने देवाला गीते गायली

मुलांच्या गरजा व वय यानुसार कार्यक्रम निवडा

**प्रार्थनाः** ''प्रिय प्रभु, शास्त्रलेखातील काव्याच्या सौंदर्याची प्रशसा करण्यास आणि दावीदाच्या मेंढपाळाच्या स्तोत्राद्वारे समाधान मिळविण्यास मुलांचे कृपा करून साहाय्य कर.''

मोठ्या मुलाने किंवा शिक्षकाने मेंढपाळाचे स्तोत्र (स्तोत्र 23) वाचावे. हे स्तोत्र आमच्या उत्तम मेंढपाळाची येशूची, दावीदाप्रमाणे आम्हाला कशी स्तुती करता येते, देव आमची अद्‌भुत प्रकारे काळजी घेतो हे दाखविते.



**प्रश्न.** प्रत्येक प्रश्नाच्या शेवटी उत्तर दिलेले आहे.

- देव आमची काळजी घेतो तेव्हा आम्हाला कोणत्या गोष्टीची उणीव पडते का? (पाहा वचन1)
- तो आम्हाला कोणत्या स्थानी नेतो? (पाहा वचन 2)
- तो आम्हाला नीतिमार्गांनी का चालवितो? (पाहा वचन 3)
- आम्ही मरणाचे भय बाळगावे का? (पाहा वचन 4)
- आम्ही चिरकाल कोठे राहणार आहोत? (पाहा वचन6)

मेंढपाळाचे स्तोत्र गा. तुम्हाला हेच शब्द असलेले गीत तुम्हाला येत असल्यास म्हणा किंवा मुलांना येत असलेल्या सुरावर हेच स्तोत्र म्हणा अथवा वेगळी चाल लावा.

गीताचे बोल म्हणत असतांना ह्या स्तोत्राचे नाट्यीकरण करा.

- मुलांना ही छोटी नाटिका सादर करता यावी यासाठी उपासनेच्या पुढाऱ्याशी चर्चा करून व्यवस्था करा.
- मुलांकडून नाटिकेचे संवाद पाठ करून घ्या.
- मोठ्या मुलांनी लहान मुलांची तयारी करण्यात मदत करावी.

- मोठ्या मुलांनी किंवा प्रौढांनी पुढील भूमिका कराव्यात:
- मेंढपाळ एक भांडे, बाटली, टेबल आणि मेंढपाळाची काठी (पुढे दिलेले चित्र पाहा तुम्हाला फांदी असलेली काठी वापरता येईल).
- निवेदक वृत्तांताचा सारांश करून मुलांकडून संवाद पाठ करून घ्या.
- लहान मुलांना पुढील भूमिका द्या. शत्रू आणि मेंढरे (हात-पाय खाली टेकवून ओणव्याने चाला आणि अधून मधून हळूच बॅऽऽ असा आवाज करा)
- निवेदक: स्तोत्र 23 गा वाचा किंवा पाठ म्हणा असे दोन वेळा करा. दुसऱ्यावेळी प्रत्येक वचन म्हटल्यावर थांबा, ह्या काळात मुले प्रत्येक वचनाचे नाट्यीकरण करतील.

**निवेदक:** (वचन 1)

**मेंढपाळ:** 'मेंढरांच्या' आजूबाजूने फिरून त्यांना प्रेमाने थोपटल्यासारखे करा.

**मेंढरे:** मेंढपाळाच्या जवळ गोळा व्हा. त्याच्याकडे पाहून हसा आणि तुम्ही आनंदी असल्याचे दाखवा.

**निवेदक:** (वचन 2)

**मेंढपाळ:** भांडे खाली ठेवा आणि मेंढरांना त्याकडे न्या.

**मेंढरे:** भांड्यातून पाणी पिण्याचा अभिनय करा. मग शांतपणे खाली बसून चारा खा.

**निवेदक:** (वचन 3)

**मेंढपाळ:** मेंढरांना हाताने तुमच्यामागे येण्याची खूण करून पुढे चाला

**मेंढरे:** मेंढपाळाच्या मागून जा.

**निवेदक:** (वचन 4)

**शत्रू:** खुर्च्यांच्या मागे लपून मेंढरांवर बाण सोडण्याचा अभिनय करा.

**मेंढरे:** घाबरल्यासारखे करा. पाय झाडा, 'बॅऽऽ' म्हणून गोल गोल पळा.

**मेंढपाळ:** मेंढरांना काठीने शत्रूंपासून ओढा आणि त्यांना शांत करा. मग हातातील काठीने शत्रुंना हुसकावून लावा. प्रत्यक्षात कोणाला मारू नका फक्त अभिनय करा.

**निवेदक:** (वचन 5)

**मेंढपाळ:** टेबल मेंढराजवळ ठेवून बाटलीतील तेल ओतल्याचा अभिनय करा.

**मेंढर:** हळूहळू तुमचे हात वर तुमच्या डोक्यावर भरून वाहणाऱ्या पात्रासारखे ठेवा.

**निवेदक:** (वचन 6)

**मेंढपाळ:** दार उघडून मेंढरांचे स्वागत करण्याचा अभिनय करा.

**मेंढरे:** दारातून आत या. मग मेंढपाळाच्या बाजूला गोलाकार गुडघे टेकून बसा आणि स्वर्गाच्या दिशेने हात उंचावून स्तुती करा.

**निवेदक:** नाटिकेसाठी मदत करणाऱ्या प्रत्येकाचे आभार माना.

**प्रश्न.** मुलांनी ह्या स्तोत्राचे नाट्यीकरण प्रौढांसमोर सादर केले असेल तर वर दिलेले प्रश्न त्यांनी प्रौढांना विचारावेत. देव आपल्या लोकांची कशी देखभाल करतो याची आणखी इतर उदाहरणे विचारा (मुलांना व प्रौढांना उदाहरणे सांगू द्यात.)

**मेंढपाळाच्या काठीचे चित्र काढा.** मुलांना त्यांनी काढलेले चित्र उपासनेच्या वेळी मोठ्या माणसांना दाखविण्यास सांगा आणि मेंढपाळाची काठी दाखवून देते की आमचा उत्तम मेंढपाळ येशू आम्हाला चांगल्या जीवनाच्या दिशेने जाण्यास मार्गदर्शन करतो.



मोठ्या मुलांना येशू आमचा उत्तम मेंढपाळ याविषयी कविता किंवा गीत लिहिण्यास सांगा.

**कविता:** मुलांना स्तोत्र 23 म्हणण्यास सांगा.

**पाठ करा.** मोठ्या मुलांना स्तोत्र 23 तर लहान मुलांना स्तोत्र 23:1-2 पाठ करण्यास सांगा.

**प्रार्थना.** ''प्रिय येशू, तू आमचा महान मेंढपाळ आहेस. तू आमच्या गरजा पुरवितोस. आम्ही संकटात आणि शत्रू व मरणाचा सामना करीत असतांनाही तुझ्यावर भरवंसा ठेवतो. तू आमचे समाधान करतो आणि तुझ्याजवळ चिरकाल राहता यावे यासाठी तू आम्हाला मरणातून स्वर्गाच्या वाटेने नेतोस. प्रभु येशू लवकर ये.''

Download Paul-Timothy studies freely from www.Paul-Timothy.net